# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.12.2024** **वार – शनिवार**

---

**पुस्तक महोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाला फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आज पासून सुरुवात होत आहे. या महोत्सवाचं उद्घाटन आज संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून या महोत्सवाच्या शुभारंभानिमित्त टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूल पासून ज्ञान सरिता ग्रंथ दिंडी काढण्यात आली. या दिंडीमध्ये शहरातील विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. यावेळी पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अभिनेते प्रवीण तरडे यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. दरम्यान पुस्तक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर प्रवेशद्वारासमोर आज एक हजार पुस्तकांचा वापर करून सरस्वतीचं चिन्ह तयार करण्यात आलं असून या कलाकृतीची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंद करण्यात आली आहे.

**दत्त जयंती**

आज मार्गशीर्ष पौर्णिमा, गुरु द्तात्रेयांचा जन्मदिवस म्हणून आज सर्वत्र साजरी केली जाते. त्यानिमित्त गाणगापूर,कुरवपूर,औदुंबर,गिरनार या आणि अशा अनेक दत्त क्षेत्रांच्या ठिकाणी आज संध्याकाळी दत्त जन्म होणार आहे.पुण्यातही काका हलवाई दत्त मंदिर तसचं विविध ठिकाणच्या दत्त मंदिरांमध्ये दत्त जयंती साजरी केली जाणार असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**एसटी कमाई**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ म्हणजे एसटीच्या प्रवासभाड्यात सवलत देणाऱ्या ‘अमृत ज्येष्ठ नागरिक योजना’ आणि ‘महिला सन्मान योजना’ सुरू केल्यापासून पुणे परिवहन विभागाच्या कमाईत मोठी वाढ झाली आहे.महिला सन्मान योजनेंतर्गत आत्तापर्यंत जवळपास चार कोटी महिलांनी तर 75 वर्षांपुढील साधारण 1 कोटी नागरिकांनी अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेंतर्गत एसटीच्या मोफत प्रवासाचा लाभ घेतला.‘पुणे महामंडळाचे १४ आगर आहेत. त्यांपैकी प्रामुख्याने शिवाजीनगर आणि स्वारगेट आगारातून मुंबई, नागपूर, ठाणे, अकोला, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यांमध्ये जाणाऱ्या एसटी बसची संख्या जास्त आहे. अशी माहिती पुणे एसटी विभागाच्या सहायक वाहतूक अधीक्षक ए. एम. शेख यांनी दिली.

**पुणे महा.अर्थसंकल्प**

पुणे महापालिकेचा येत्या वर्षाचा अर्थसंकल्प आखताना मूलभूत सुविधांसाठी भरघोस तरतूद करावी अशी आग्रही मागणी क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांनी केली आहे.पुणे महापालिका प्रशासकाला फेब्रुवारी

महिन्यात तीन वर्षे पूर्ण होत आहेत. शहरातील विविध प्रभागात नागरिकांचं म्हणणं ऐकून घेऊन त्याप्रमाणे अर्थसंकल्प तयार करण्याचं "नगरसेवक" हे माध्यम आहे, मात्र गेल्या तीन वर्षांपासून हे माध्यमच अस्तित्वात नसल्यानं प्रशासन विविध खात्यांच्या मागणीनुसार अर्थसंकल्पाची रचना करत आहे. पण मूलभूत नागरी सुविधांसाठी जादा तरतूद आवश्यक असल्याचं खर्डेकर यांनी म्हटलं आहे.

**महावितरण**

निमशहरी आणि ग्रामीण भागात वीजबिल भरणं सोयीचं करणार्या तसचं छोट्या व्यावसायिकांना उत्पन्न मिळवून देणाऱ्या महावितरणच्या महापॉवर-पे या पेमेंट वॉलेटला पुणे जिल्ह्यांसह पश्चिम महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळाला आहे.आतापर्यंत 601 जणांनी ‘महापॉवर-पे’ वॉलेटच्या माध्यमातून वीज बिल भरणा केंद्र सुरू केलं आहे. छोटे व्यावसायिक, किराणा, मेडिकल, दुकानदार, बचत गट, विद्यार्थी, महावितरणचे वीजबिल वाटप एजन्सी आणि मीटर वाचन करणार्या संस्था वॉलेटधारक होऊ शकतात.महापॉवर-पेचे वॉलेटधारक होण्यासाठी इच्छुकांनी महावितरणच्या विभागीय, उपविभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा, असं आवाहन पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांनी केलं आहे.

**माजी सैनिक आंदोलन**

माजी सैनिकांची कोट्यावधी रुपयाची कथित आर्थिक फसवणूक करणाऱ्या विरुद्ध तत्काळ कारवाई करण्याच्या मागणीसाठी माजी सैनिकांनी आज पोलीस आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन केलं.यावेळी फसवणूक करणाऱ्या सर्व आरोपींना अटक करावी तसेच त्यांना न्यायालय पुढे सादर करून हा तपास तत्काळ पूर्ण करून सर्व माजी सैनिकांना त्यांचे पैसे लवकरात लवकर परत मिळावे अशी भावना यावेळी सैनिकांनी व्यक्त केली.

**टपाल कार्या.वेळ**

पुणे शहर पश्चिम विभागामार्फत कात्रज आणि धनकवडी टपाल कार्यालयांच्या रजिस्टर,स्पीड पोस्त, पार्सल बुकिंग सेवेच्या वेळेत नागरिकांच्या वाढत्या मागणीस अनुसरून वाढ करण्यात आली आहे. या टपाल कार्यालयांची सुधारित वेळ आता सकाळी 9 ते संध्याकाळी साडे 4 पर्यंत असेल त्यामुळं जास्तीत कस्त नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असं आवाहन पुणे शहर टपाल पश्चिम विभागाच्या प्रवर अधिकार्यांनी केलं आहे.

**पालिका योजना**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला आणि बालकल्याण योजना, दिव्यांग विकास योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना आणि इतर कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनाना पालिका प्रशासनानं 31 डिसेंबर पर्यंत मुदतवाढ दिली आहे. अर्जदारांनी पालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अथवा समाज विकास विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन केलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र सकाळपासून हवेत गारवा जाणवत असून किमान तापमान 10 पूर्णांक 10 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.उद्यासुद्धा तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**